PRABHAT KIDS SCHOOL (CBSE Affiliation No. 1130426)

# Prabhat Kids School, Akola 2025-26

(CBSE Affiliation No. 1130426)

Std.X Section : ____________ **Subject : Marathi**

Date : ______________ **Periodic Test - III** **Marks : 20**

Name :__________________________________________ Roll No. _____________ **Time : 1.00 Hr.**

## विभाग 'अ' (अपठित उतारा आकलन)

## विभाग : अ [आकलन]

**प्रश्न १ : पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** **गुण ५**

माझ्या उगवत्या ताऱ्यांनो व तारकांनो, मोठेपणाचा मार्ग अनेक खांच-खळग्यांनी व अडी-अडचणींनी भरलेला असतो. पण म्हणूनच त्या अडी-अडचणींवर मात करण्यात किंवा त्यांना ठोकरून देण्यात खरा पुरूषार्थ आहे ना?

परंतु अडी-अडचणींवर मात करून किंवा केवळ त्याना ठोकरून देऊन माणूस पुढे जातोच, असे मात्र नाही. त्याकरिता आपल्या डोळ्यांपुढील ध्येय मंदिर गाठण्यासाठी कुठल्या रस्त्याने गेले पाहिजे, ते अगोदर अचूक हेरता आले पाहिजे आणि त्यासाठी, आपण आपली बुद्धी अतिशय विचारी आणि मन अनुभवाने समृद्ध केले पाहिजे.

बुद्धीची विचार करण्याची कुवत अनुभवाने वाढत असते. परंतु प्रत्येक बऱ्या-वाईट गोष्टीचा अनुभव स्वतः घेणे, हे माणसाला महाग पडते. तेव्हा दुसऱ्यांच्याही अनुभवांचा सारासार विचार करून स्वतःसाठी उपयोग करून घेणे, हे बऱ्याच वेळा हिताचे ठरते.

त्या दृष्टीने भारतातील व इतर देशांतील काही वेचक, बोधक असलेली माहिती आपण खऱ्या अर्थाने अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. आजकाल तुम्हा मुलामुलींचा दिवसाचा बराचसा वेळ शाळा, शिकवणी व गृहपाठ यात जात आहे आणि रात्री झोपेपर्यंतचा वेळ दूरदर्शनवरचे तुम्ही न पहाण्यासारखे - शृंगारिक व खून-मारामारींचे कार्यक्रम पहाण्यात जात आहे. तेव्हा बालमित्रांनो व मैत्रिणींनो, कृपा करून तसले कार्यक्रम पहाण्यात वेळ वाया घालवू नये. त्याऐवजी अशा सकस गोष्टींचे वाचन करून, मन अनुभवाने समृद्ध करा. असे केलेत, तर आयुष्याच्या पुढल्या वाटचालीत, यश तुमचेच आहे.

१ : आयुष्यातील मोठेपणाचा मार्ग कसा असतो?

अ) सरळ आणि सोपा ब) अनेक खाच-खळग्यांनी आणि अडचणींनी भरलेला

क) केवळ नशिबावर अवलंबून ड) कोणताही मार्ग नाही

२ : बुद्धीची विचार करण्याची क्षमता कशाने वाढते?

अ) फक्त शाळेत शिकल्याने ब) अनुभवाने

क) खूप पैसे खर्च केल्याने ड) फक्त दूरदर्शन पाहिल्याने

३ : दुसऱ्यांच्या अनुभवांचा विचार करून त्याचा उपयोग करणे हिताचे का ठरते?

अ) कारण स्वतः प्रत्येक अनुभव घेणे खूप महाग पडते.

Sample Paper Prabhat Kids School, Akola

ब) कारण स्वतःकडे पुरेसा वेळ नसतो.

क) कारण त्यामुळे प्रसिद्धी मिळते.

ड) कारण त्यामुळे शिक्षण पूर्ण होते.

४ : आजकाल मुलामुलींचा बराचसा वेळ कशात जातो, असे लेखकाने म्हटले आहे?

अ) खेळ आणि गृहपाठ　　ब) शाळा, शिकवणी आणि गृहपाठ

क) फक्त दूरदर्शन पाहण्यात　　ड) मित्रांबरोबर गप्पा मारण्यात

५ : लेखक मुलामुलींना कोणत्या प्रकारचे कार्यक्रम पाहण्यापासून परावृत्त करत आहेत?

अ) क्रीडा आणि विज्ञान　　ब) माहितीपट

क) शृंगारिक आणि खून-मारामारीचे कार्यक्रम　　ड) विनोदी कार्यक्रम

६ : लेखक मुलामुलींना कोणत्या गोष्टीचे वाचन करण्याचा सल्ला देत आहेत?

अ) जुन्या वर्तमानपत्रांचे　　ब) सकस गोष्टींचे

क) फक्त पाठ्यपुस्तकांचे　　ड) मोबाईलवरील बातम्यांचे

Sample Paper
Prabhat Kids School, Akola

**विभाग ब (व्याकरण)**

**प्रश्न २. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही ५)　　५ गुण**

१) महात्मा फुलेंचे कार्य कोण विसरले? (विधानार्थी करा.)

अ) महात्मा फुलेंचे कार्य सारे विसरतील.

ब) महात्मा फुलेंचे कार्य कोणीही विसरणार नाही.

क) महात्मा फुलेंचे कार्य कोण विसरणार आहे.

ड) महात्मा फुलेंचे कार्य कोण लक्षात ठेवेल.

२) वा! काय छान कविता केलीस तू! (वाक्याचा प्रकार ओळखा.)

अ) आज्ञार्थी　　ब) विधानार्थी　　क) प्रश्नार्थी　　ड) उद्गारार्थी

३) समोरचे जंगल दाट आहे.(नकारार्थी करा.)

अ) समोरचे जंगल दाट नाही.　　ब) समोरचे जंगल घनदाट आहे.

क) समोरचे जंगल विरळ नाही.　　ड) समोरचे जंगल विरळ आहे.

४) सर्वांनी एकत्र येऊन लढा द्या. (वाक्याचा प्रकार ओळखा.)

अ) आज्ञार्थी　　ब) विधानार्थी　　क) प्रश्नार्थी　　ड) उद्गारार्थी

५) खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) चौघडी　　ब) पंचप्राण　　क) सातआठ　　ड) त्रिभुवन

६) ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' या समुच्चय बोधक उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करावा लागतो, त्यास..............समास असे म्हणतात.

अ) वैकल्पिक द्वंद्व　　ब) इतरेतर द्वंद्व　　क) समाहार द्वंद्व　　ड) द्विगू

७) कृष्णार्जुन(समास ओळखा.)

अ) वैकल्पिक द्वंद्व समास　　ब) अव्ययीभाव समास

क) समाहार द्वंद्व समास    ड) इतरेतर द्वंद्व समास

**विभाग क (पाठ्यपुस्तक आधारित)**

**प्रश्न ३ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) ३ गुण**

१) अभिषेक सुमितच्या लॅपटॉप वर काय पाहत होता?

२) कोणाच्या डोळ्यातला क्रोध अब्दुलच्या परिचयाचा होता?

३) सुमितच्या मामाच्या मते सगळ्यात भारी अॅप कोठे आहे?

४) चुडीवाला या पाठाचे लेखक कोण?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा. २ गुण**

१) 'अब्दुल एक थोर समाजसेवक' या विधानाची सत्यता पटवून द्या.

२) 'तापाने फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.

**विभाग ड (लेखन)**

**प्रश्न ४. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा. (कोणतीही १) ५ गुण**

आंतरशालेय क्रीडास्पर्धा--धावण्याची स्पर्धा--शाळेतर्फे वरदचा सहभाग--वरद उत्तम धावपटू--खूप सराव-- उत्तम धावपटू असणाऱ्या तनयशी त्याची स्पर्धा--प्रत्यक्ष स्पर्धेचा दिवस –अटीतटीची स्पर्धा--अचानक तनयचा पाय मुरगळणे--स्पर्धा सोडून वरदचे मदतीला धावणे--स्पर्धा हरूनही वरदचे कौतुक–तात्पर्य.

**किंवा**

उंट व कोल्हा मित्र--पाणी पिण्यासाठी नदीवर जाणे--नदीपलीकडील उसाचे शेत पाहून खाण्याची इच्छा--उंटाचे कोल्ह्याला पाठीवर बसवून नदी पार करणे--लवकर पोट भरल्याने कोल्ह्याचे ओरडणे--उंटाची न ओरडण्याबद्दल विनंती--शेताचा मालक धावत येणे--कोल्ह्याचे पळून जाणे--उंटाला मार--परत येताना उंटाचे नदीच्या अगदी मध्यभागी पाण्यात बसणे--कोल्ह्याची न बसण्याची विनंती-कोल्ह्याच्या नाका-तोंडात पाणी-- कोल्ह्याला आपली चूक कळणे, माफी मागणे -- तात्पर्य.

---------

Sample Paper Prabhat Kids School, Akola